राज्यातील महानगरपालिका क्षेत्राबाहेर गेलेली व नगरपालिकेच्या / ग्रामपंचायतीच्या हद्दीत अंतर्भाव न झालेले असे त्रिशंकू क्षेत्रामधील समस्यांबाबत उपाययोजना करण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**शासन निर्णय क्र. टिपीएस-१८२४/अनौंस-४४/प्र.क्र.१५६/२०२४/नवि-१३**

मुख्य इमारत, ४ था मजला, मादाम कामा मार्ग

हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**दि :०६.०१.२०२५**

# आदेश

**प्रस्तावना :-**

I. महाराष्ट्र राज्यात नागरीकरणाचे प्रमाण ४५.२३% इतके आहे. व्यापक प्रमाणावर होणाऱ्या नागरीकरणामुळे २७ महानगरपालिका व ३८१ नगरपालिका यांच्यावर नागरी सुविधा पुरविण्यासाठी येणारा ताण दिवसेंदिवस वाढत आहे. नागरी लोकसंख्या हळूहळू शहराच्या हद्दीबाहेर जात आहे.

II. महानगरपालिका क्षेत्राबाहेर गेलेली व नगरपालिकेच्या / ग्रामपंचायतीच्या हद्दीत अंतर्भाव न झालेले असे त्रिशंकू क्षेत्र निर्माण होण्याचे प्रमाण वाढले आहे. भविष्यात या क्षेत्रांचा समावेश ग्रामपंचायत / नगरपालिका / महानगरपालिका हद्दीत होणे क्रमप्राप्त आहे. मात्र तोपर्यत या क्षेत्रात नागरी सुविधा पुरविल्या जात नाहीत आणि त्रिशंकू क्षेत्राची अनियंत्रित व अनियोजित वाढ होत जाते. त्रिशंकू क्षेत्रामध्ये अशा नागरी समस्या निर्माण होण्यापूर्वीच त्यांना प्रतिबंध / नियोजित करणे आवश्यक आहे.

III. सबब, सदर विषयाच्या अनुषंगाने त्रिशंकू क्षेत्रातील समस्या जाणून घेऊन त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी अपर मुख्य सचिव, महसूल विभाग यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

**०२. शासन निर्णय :-**

राज्यातील महानगरपालिका क्षेत्राबाहेर गेलेली व नगरपालिकेच्या / ग्रामपंचायतीच्या हद्दीत अंतर्भाव न झालेले असे त्रिशंकू क्षेत्रामधील समस्यांबाबत उपाययोजना प्रस्तावित करणे व अस्तित्वात असलेल्या कायद्यांमध्ये सुधारणा प्रस्तावित करणे. आवश्यक असल्यास त्याप्रमाणे सदर विषयी आवश्यक विनियम व शिफारशी तयार करुन त्याचा सर्व समावेशक अहवाल शासनास सादर करण्यासाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA, MUMBAI-32

| | | |
|---|---|---|
| १. | अपर मुख्य सचिव, महसूल विभाग | अध्यक्ष |
| २. | अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग | सदस्य |
| ३. | प्रधान सचिव, नगर विकास विभाग (नवि-१) | सदस्य |
| ४. | प्रधान सचिव, नगर विकास विभाग (नवि-२) | सदस्य |
| ५. | प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग | सदस्य |
| ६. | प्रधान सचिव, (व्यय), वित्त विभाग | सदस्य |
| ७. | संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य सचिव |

**०३. उपरोक्त गठीत समितीची कार्यकक्षा व कालबद्ध कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील :-**

i. महाराष्ट्र राज्यातील काही क्षेत्रे अशी आहेत जी कोणत्याही महानगरपालिका/ नगरपालिका किंवा ग्रामीण स्थानिक संस्थेमध्ये (RLB) समाविष्ट नाहीत, या क्षेत्रांना सामान्यतः त्रिशंकू क्षेत्रे म्हटले जाते. या क्षेत्रांना कोणतीही स्थानिक स्वराज्य संस्था नागरिक सेवांसाठी आणि सुविधा प्रदान करण्यासाठी कायदेशीर रित्या अधिकृत व जिम्मेदार नसल्याने त्यांना या नागरीक सुविधा मिळत नाहीत. समितीने या सर्व क्षेत्रांचा तपास करून असे त्रिशंकु क्षेत्र कोणत्या स्थानिक संस्थेत समाविष्ट केले जावे याबाबत प्रस्तावित करावे. जेणेकरून ज्याप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्था त्यांचे हद्दीमध्ये नागरिक सेवांसाठी ज्या सेवा/सुविधा प्रदान करते, त्याचप्रमाणे सेवा/सुविधा आणि सेवांचा लाभ त्रिशंकू क्षेत्रामधील नागरिकांना मिळू शकेल.

ii. राज्यातील महानगरपालिका आणि प्रमुख शहरांच्या आसपास असलेली ग्रामपंचायत क्षेत्रे अशी आहेत ज्यावर विकासाचा दबाव आणि सुविधांची मागणी शहरी भागांप्रमाणेच आहे. अशा क्षेत्रांमध्ये प्रशासकीय दृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या मजबूत स्थानिक संस्था नसल्यामुळे या Peri Urban Area क्षेत्रांचा अनियंत्रित आणि अपारदर्शक विकास होत आहे आणि सेवा देखील योग्य दर्जाच्या नाहीत. लवकरच या क्षेत्रांचा शहरी स्थानिक संस्थेत समावेश होणे अपेक्षित असून त्या वेळी शहरी क्षेत्रावर आधी झालेल्या अनधिकृत व पध्दतशीर झालेल्या विकासाचा ताण पडेल आणि नियमितीकरणाच्या मागणी तसेच नागरी सुविधांचा पुरवठा करण्याची गरज यामध्ये संतुलन साधावे लागेल. उक्त समितीने याविषयी प्रस्तावित करावे की, कायदेशीर आणि प्रशासकीय दृष्टिकोनातून कोणती प्रणाली ठेवली जाऊ शकते, ज्यामुळे या उपनगर क्षेत्रांमध्ये अनियंत्रित आणि अनियोजित वाढ होणार नाही आणि त्यांना आवश्यक असलेले विकास निधी मिळतील, ज्यामुळे भविष्यात त्यांचा शहरी क्षेत्रात समावेश सहज होईल.

iii. उक्त समितीने नागरिकरणाचा वेग व विकासाचा दबाव विचारात घेऊन विकास योजना तयार करण्याच्या अनुषंगाने संपूर्ण राज्यभरातील किमान १०० परिसर विकास केंद्रे (Growth Centers) प्रस्तावित करावीत.

iv. उक्त समितीने अस्तित्वात असलेल्या कायद्यामध्ये/ विनियमामध्ये सुधारणा करणे अथवा नवीन तरतूद करणे आवश्यक असल्यास त्याप्रमाणे शासनास शिफारस करण्यात यावी.

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

v. उक्त समितीचे अध्यक्ष यांचे निर्देशानुसार समितीची कार्यपद्धती निश्चित करण्यात यावी. समितीच्या होणाऱ्या बैठका अध्यक्षांच्या सुचनेनुसार आयोजीत करण्यात याव्यात. सदर बैठका आयोजित करणे व अनुषंगिक कार्यवाही समितीचे सदस्य सचिव यांनी करण्यात यावी.

vi. उक्त समितीस सदर विषयाचे तज्ञ, शासनाच्या इतर विभागातील तसेच आवश्यकतेनुसार राज्यातील महानगरपालिका / नगरपालिका यांचेशी समन्वय साधून आवश्यक ती माहिती घेता येईल. तसेच, सदर समितीस आवश्यकता असल्यास सदर विषयांशी संबंधित सदस्यांचा समावेश उक्त समितीमध्ये करता येईल.

vii. उक्त समितीने शासन निर्णयाचे दिनांकापासून वरीलप्रमाणे कार्यवाही पूर्ण करुन आवश्यक विनियम व शिफारशीसह समितीचा सर्व समावेशक प्रारुप अहवाल २ महिन्यांचे कालावधीत शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे/ नियम ) या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.*

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA, MUMBAI-32

**(डॉ.प्रतिभा भदाणे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई -३२.
२. मा.उप मुख्यमंत्री महोदय यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.
३. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
४. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई - ३२.
५. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-३२.
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई -३२.
७. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२.
८. अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२.
१०. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२.
११. प्रधान सचिव, (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२.
१२. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
१३. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
१४. संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५. संचालक, नगर रचना तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
१६. कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
/- सोबतचा शासन निर्णय या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावा.
१७. कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.
/- सोबतचा शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावा.
१८. निवड नस्ती, कार्यासन (नवि-१३).

*********************